# मेट्रोत बसा, सायन्स म्युझियम बघा

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो मार्ग ३ चे काम वेगाने सुरु असून, आता दक्षिण मध्य मुंबईतील सायन्स म्युझियम या मेट्रो स्थानकनही लाइम लाइटमध्ये आले आहे. या स्थानकाचे कामही जवळपास पूर्ण होत आले असून, विज्ञानप्रेमींसाठी सायन्स म्युझियम मेट्रो रेल्वे स्थानक म्हणजे पर्वणीच ठरणार आहे. कारण या स्थानकावरून उतरून विज्ञानप्रेमींना थेट नेहरू सायन्स सेंटर गाठता येणार असून, दक्षिण मध्य मुंबईतल्या वरळी आणि महालक्ष्मीसारख्या ठिकाणीही सहज जाता येणार आहे.



भुयारी मार्गात अभियांत्रिकी कामे सुरु आहेत.



स्थानकांत सरकते जिनेही बसवले आहेत.



■ सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानक या टप्प्यातील भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परेल रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रेल्वेमार्गाच्या खालून करण्यात आले आहे. हे बोगदे जेकब सर्कल येथील महानगर पालिकेच्या १७ मीटर खोल भूमिगत गटार पम्पिंग स्टेशनच्या जवळ आहेत. त्यामुळे येथे भुयारीकरण करणे जिकिरीचे होते.

**१०४.४६** मीटर ओव्हर्ट लायनिंगचे काम १७९ दिवसांत करण्यात आले आहे.




## सर्वात लांब पट्टा

मेट्रो-३ मार्गातील सर्वात लांब पट्ट्यांपैकी एक असलेल्या पॅकेज-३ मध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

## कफ परेडमध्ये काय सुरु आहे?

दक्षिण मुंबईमधील कफ परेड हे एक अत्यंत महत्त्वाचे मेट्रो रेल्वे स्थानक आहे. या स्थानकाचे कामही वेगाने सुरु आहे. कफ परेड ते सीएसएमटी स्थानकापर्यंतचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. भुयारीकरणाचा हा ३८वा टप्पा यशस्वीरीत्या पार पडला. हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा अप-लाइन मार्गाचा ५५७ मीटर भुयारीकरणाचा टप्पा १४९ दिवसांत पूर्ण झाला.